पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ १२८ /२०२३ दि. ४ /०९/२०२३

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी,** वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२३ रोजी संकल्प प्रतिष्ठान, ठाणे यांचे वतीने **'गोपाळकाला'** सणामिमित्त संकल्प चौक येथे मंडप उभारण्यात येणार आहे. तसेच सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) साईमास हॉटेल/मोहनजी सुंदरजी मार्ग कडून संकल्प चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना साईमास हॉटेल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सर्व्हिस रोडने सरळ जावून एल.आय.सी. ऑफिस कडून डावे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) जुना पासपोर्ट ऑफिस कडून संकल्प चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना जिलानेवाडी, अर्जुना पार्क बिल्डींग येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने जिलानेवाडी, अर्जुना पार्क बिल्डींग कडून डावे वळण घेवून हाजूरी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसुचना दि. ०७/०९/२०२३ रोजी ००:०१ ते रात्रौ २४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा.जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी,**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, परिवहन उपक्रम ठाणे महानगरपालिका, ठाणे व बृहन्मुंबई मनपा (बीईएसटी)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १, ठाणे व परिमंडळ – ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

CamScanner

**प्रत** :– **पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर**

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– **समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे**

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– **सपोआ ठाणे वाहतूक उपविभाग.**

प्रभारी अधिकारी, वागळे इस्टेट/नौपाडा वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CS CamScanner